नि.फौ.ख.क्र. ७८/२०२४
शासन विरुध्द दिपक
नि.क्र. १२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – मनोजकुमार विनायक जाधव
वय – ४४ वर्षे,
कामधंदा – खाजगी नोकरी
राहणार – भांडुप, मुंबई, मुळ राहणार - भुईंज

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर. जाधव -**

दिनांक ०४/१०/२०२३ रोजी मी माझ्या मुळ गावी भुईंज येथे हजर होतो. त्यादिवशी रात्री जेवण करून झोपी गेल्यानंतर सकाळी ५.०० वाजता च्या सुमारास मला असे लक्षात आले की आमचा पाणी तापविण्याचा पाण्याचा बंब चोरीस गेला. त्याची अंदाजे किंमत रूपये ८,०००/- होती. तो पत्र्याच्या शेडच्या पोलला लोखंडी साखळीने कुलूप बंद केलेला होता आणि त्यात पाणी देखील होते. त्याची साखळी तोडलेली होती व ती तेथेच बंब ठेवण्याच्या लोखंडी स्टॅण्ड जवळ पडलेली होती. मी तो बंब शोधण्याचा प्रयत्न केला परंतु तो मिळून आला नव्हता. मी दिनांक ०६/१०/२०२३ रोजी सदरील घटनेची फिर्याद अज्ञातांविरूद्ध दिलेली होती. आता मला ती फियार्द दाखविली ती तीच असून त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे. ती **निशाणी क्र. १३** वर आहे.

२. दिनांक ०५/१०/२०२३ रोजी मला असे कळाले की, सदरील चोरीस गेलेला बंब मिळून आलेला आहे आणि त्याकरिता मला पोलिस ठाण्यात बोलाविण्यात आले होते. अशा प्रकारे फिर्याद देण्यापूर्वी सदरील बंब मिळून आल्याचे मला कळून आले होते. त्याप्रमाणे मी दिनांक ०६/१०/२०२३ रोजी पोलिस ठाण्यात गेलो आणि तेथे मी तो बंब पाहिला आणि घटनेची फिर्याद दिली. सदरचा बंब पोलिसांना कुणाच्या ताब्यातून मिळाला याबाबत मला माहिती नाही. मी आरोपी दिपक यांस ओळखतो. तो मासे विक्रीचा व्यवसाय करतो. तो आज न्यायालयात हजर आहे. त्याचा प्रस्तुत प्रकरणाशी काही संबंध आहे किंवा कसे याबाबत मला कधीही काहीही वाटले नाही. तदनंतर मला पोलिस कर्मचारी तोरडमल

यांनी मला सांगितले की, आरोपीने तो बंब चोरून नेला आणि तो मिळून आला. डिसेंबर २०२३ मध्ये मला पोलिस ठाण्यातून सदरचा बंब परत मिळाला.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ एल. जी. जेजुरीकर -**

३. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा बंब नेमका कोणी चोरून नेला याबाबत मला व्यक्तीशः कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा पाणी तापविण्याचा तांब्याचा बंब चोरीस गेल्याचे मी सरतपासात खोटे सांगितले आहे.

***उलटतपास पूर्ण.***

***फेरतपास काही नाही.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.03.17 12:46:52 +0530

दि. १५.०३.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१,वाई.